(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**[२०२३] ३ एस. सी. आर. १८**

हरयाणा राज्य आणि इतर

वि.

निरंजन सिंग आणि इतर वगैरे

(दिवाणी अपील क्र. १३४७-१३४९/२०२३)

२४ फेब्रुवारी, २०२३

**[एम. आर. सिंग आणि सी. टी. रविकुमार, न्या. न्या.]**

भूसंपादन *:* भूसंपादन कार्यवाही - संपादित केलेली जमीन मुक्त करणे - विकासासाठी संपादित क्षेत्राचा मोठा भाग आणि जमिनीचा निवासी आणि व्यावसायिक क्षेत्र म्हणून वापर करणे - अधिसूचनेच्या आणि निवाड्याच्या टप्प्यादरम्यान आणि निवाडयानंतर मुक्त केलेल्या जमिनीचा मोठा भाग - संपादित जमिनीचे केवळ छोटे भूखंड - त्यास आव्हान देणारी जमीन मालकांची रिट याचिका - जमीन मालकांना प्राधिकाऱ्यांसमोर निवेदन दाखल करण्याचे स्वातंत्र्य दिले - अशाच प्रकारे वस्तुस्थिती असलेल्या ज्या जमीनमालकांच्या जमिनी राज्याने मुक्त केल्या, त्याच नियमाने त्यांच्या अधिग्रहित जमीन मुक्त करण्याची मागणी करणारे निवेदन - तथापि, रिट याचिकांमध्ये उच्च न्यायालयाने जमीन मालकांच्या जमिनी

अधिग्रहणातून मुक्त करण्याचे निर्देश दिले - अपीलामध्ये असा निर्णय देण्यात आला : प्रारंभी प्रभावशाली व्यक्तींच्या जमिनी मुक्त करण्याची अपीलकर्त्यांची कृती आणि त्यानंतर, उच्च न्यायालयाने पारित केलेल्या विविध आदेशांच्या आधारे, ज्यांना कधीही आव्हान दिले गेले नाही, सार्वजनिक कारणांसाठी आवश्यक असलेल्या अधिग्रहित जमिनी मुक्त करताना अपीलकर्त्यांनी अधिकारांचा मनमानी वापर केल्याचे दिसून येते - भविष्यातील गरजा आणि विस्तार विचारात घेणे आवश्यक आहे - प्रश्नांकित संबंधित छोटा भाग / भूखंड वगळता, जमिनीचा इतर सर्व मोठा भाग एकतर राज्याने स्वत: आणि / किंवा उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार मुक्त केला आहे - जमीन सन १९८७ मध्ये संपादित करण्यात आली होती परंतु ज्या सार्वजनिक हेतूसाठी ती संपादित केली गेली होती त्या कारणाकरिता ती वापरली गेली नाही - अशा प्रकारे, उच्च न्यायालयाने अधिग्रहण प्रक्रिया योग्यरीत्या रद्द केली आणि ती मुक्त करण्याचे निर्देश दिले - परंतु, मलनिःस्सारण वाहिन्यांसाठी वापरात आणलेली जमीन, जी जमीन रस्ता रुंदीकरणाच्या हेतूने आवश्यक असलेल्या जमिनी मुक्त करण्यात येऊ नयेत आणि उच्च न्यायालयाने अशा जमिनींसंदर्भातील संपादनाची कार्यवाही रद्द करायला नको होती - संपादित केलेल्या उर्वरित जमिनी मुक्त करण्याचे निर्देश देण्यात उच्च न्यायालयाने चूक केली - उच्च न्यायालयाने पारित केलेला आदेश रद्द बातल.

न्यायिक नापसंती : भूसंपादन कार्यवाही - अधिग्रहित जमिनी मुक्त करणे - नगरविकास प्राधिकरणामार्फत नवीन क्षेत्रांचा विकास करण्यासाठी निवासी व व्यावसायिक क्षेत्र म्हणून वापरासाठी व विकासासाठी संपादित केलेल्या जमिनी - संपादन प्रक्रियेच्या टप्प्यांत वेळोवेळी मुक्त करण्यात आलेल्या संपादित जमिनी - राज्य सरकारने सुरुवातीला

प्रभावशाली व्यक्तींच्या आणि त्यानंतर उच्च न्यायालयाने पारित केलेल्या विविध आदेशांच्या अनुषंगाने, ज्यांना राज्याने कधीही आव्हान दिले नाही, मुक्त केलेल्या जमिनी - असा निर्णय देण्यात आला की : हे अत्यंत अवमूल्यनकारक आहे - हे सार्वजनिक कारणांसाठी अशा प्रकारे आवश्यक असलेल्या अधिग्रहित जमिनी मुक्त करण्यात राज्याने अधिकारांचा मनमानी वापर केल्याचे दर्शविते - राज्य सरकार सार्वजनिक हिताचे आणि जनतेचे पालक आहे - सुरुवातीच्या टप्प्यात प्रभावशाली व्यक्तींच्या जमिनी मुक्त करण्यापेक्षा सार्वजनिक हित हे सर्वोच्च हित म्हणून विचारात घेणे आवश्यक होते.

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्र. १३७-१३४९/२०२३.

पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाच्या चंदीगढ येथील सीडब्ल्यूपी क्र. ६७२९, १६३४६/२०१३ आणि १०४५२/२०१४ मधील दिनांक ०९.०४.२०२१ च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी आलोक सांगवान, अति. महान्यायअभिकर्ता, सुमित कुमार शर्मा, रजत सांगवान, डॉ. मोनिका गुसाईं, गौरव अग्रवाल, साहिल तगोत्रा, अभिव्यक्ती बॅनर्जी, अधिवक्ते.

नीरज कुमार जैन, नरेंदर हुडा, वरिष्ठ अधिवक्ते, आभास क्षेत्रपाल, सिद्धार्थ झा, श्रीमती

प्रियांमबिका, एमके झा, सचिन जैन, राजीव रंजन द्विवेदी, डॉ. सुरेंद्र सिंह हुडा, आदित्य मिश्रा, शौर्य लांबा, आदित्य हुडा, श्रीमती बानो देसवाल, उत्तरवाद्यांकरिता अधिवक्ते.

न्यायालयाचा न्यायनिर्णय **एम. आर. शहा, न्या.** यांनी दिला.

१. चंदीगड येथील पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाने सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३, सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ आणि सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ मध्ये दिनांक ०९.०४.२०२१ रोजी पारित केलेला आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश, ज्याद्वारे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सदर रिट याचिका मंजूर केल्या आहेत आणि मूळ रिट याचिकाकर्त्यांची - मूळ जमीन मालकांची संबंधित अधिग्रहीत जमीन अधिग्रहणापासून मुक्त करण्याची विनंती फेटाळून लावण्याची राज्याची कारवाई रद्द केली आहे आणि परिणामी, आपापली अधिग्रहित जमीन (जमिनी) अधिग्रहणापासून मुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत, त्या न्यायनिर्णय आणि आदेश यांनी व्यथित आणि असामाधानी होऊन, हरियाणा राज्य आणि इतरांनी प्रस्तुत अपीले दाखल केली आहेत. सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ - रिट याचिकेमध्ये पारित केलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश यांनी व्यथित आणि असमाधानी होऊन, संपादनाच्या लाभार्थ्यांनीसुद्धा डायरी क्र. ३७०५२/२०२२ मधून उद्भवलेले प्रस्तुत अपील दाखल केले आहे.

१.१ प्रारंभी, या बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे की, वि. अ. या. (दि.) क्र. ११८४२/२०२२ मधून उद्भवलेल्या दिवाणी अपील क्र. १३४७/२०२३ चा संबंध आहे, तर ते उच्च न्यायालयाने सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ मध्ये पारित केलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि

आदेशाच्या विरुद्ध आहे. जेथे वि. अ. या. (दि.) क्र. ११८४३ /२०२२ मधून उद्भवलेल्या दिवाणी अपील क्र. १३४८/२०२३ चा संबंध आहे, तर ते सीडब्ल्युपी क्र. १६३४६/२०१३ मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाच्या विरुद्ध आहे आणि जेथे वि. अ. या. (दि.) क्र. ११८४४ /२०२२ मधून उद्भवलेल्या दिवाणी अपील क्र. १३४९/२०२३ चा संबंध आहे, तर ते सीडब्ल्युपी क्र. १०४५२ /२०१४ मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाच्या विरुद्ध आहे.

२. सोयीसाठी सीडब्ल्यूपी क्र. १६३४६ मधील तथ्ये, जी उच्च न्यायालयानेसुद्धा प्रमुख मुद्दा म्हणून विचारात घेतली होती, ती विचारात घेतली आहेत.

**<u>सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ मधून उद्भवलेल्या दिवाणी अपील</u>**

**<u>क्रमांक १३४८/२०२३ मधील तथ्ये</u>**

२.१ असे की, भूसंपादन अधिनियम, १८९४ (यापुढे अधिनियम असे संबोधण्यात आले आहे) च्या कलम ४ अन्वये, हरयाणा राज्याने, निवासी आणि व्यावसायिक सेक्टर ११, कुरुक्षेत्र म्हणून जमिनीचा विकास आणि वापर करण्यासाठी ३५.७६ एकर जमीन संपादित करण्याच्या हेतूने, दिनांक २१.०४.१९८७ रोजी एक अधिसूचना जारी केली आणि त्यानंतर अधिनियमाच्या कलम ६ अन्वये दिनांक २०.०४.१९८८ रोजी घोषणा / अधिसूचना जारी केली गेली. सर्व संबंधित जमीन मालकांकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. असे की, त्यानंतर भूसंपादन जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक १२.०४.१९९० रोजी केवळ ३४.६१ एकर जमिनीसाठी निवाडा जाहीर केला. असे की, त्यानंतर अधिनियमाच्या कलम ४ अन्वये हरियाणा राज्याने कुरुक्षेत्रमधील सेक्टर ६ व ११ मधील १२६.३० एकर जमीन निवासी,

व्यावसायिक व संस्थात्मक कारणांसाठी संपादित करण्यासाठी दिनांक ११.०२.२००२ रोजी पुढील अधिसूचना जारी केली. असे दिसून येते की, अधिनियमाच्या कलम ६ अन्वये अधिसूचना जारी होण्यापूर्वीच ४३ भूधारकांची ८१.९१ एकर जमीन मोकळी करण्यात आली असून, त्याचा तपशील खाली विचारात घेतला जाईल. असे की, त्यानंतर, सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ चे मूळ रिट याचिकाकर्ते वगळता, राज्य सरकारच्या किंवा उच्च न्यायालयाने विविध रिट याचिकांमध्ये पारित केलेल्या आदेशा (आदेशां) नुसार वेगवेगळ्या जमीन मालकांच्या अधिग्रहित केलेल्या उर्वरित जमिनी, ज्यांचे क्षेत्रफळ ४०.८० एकर आहे, संपादनातून मुक्त करण्यात आल्या. दिनांक २१.०४.१९८७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे संपादित केलेल्या जमिनीच्या संदर्भात मुक्त केलेल्या जमिनींचा तपशील सारणीबद्ध स्वरूपात खालीलप्रमाणे आहे :-

| अनु. क्र. | भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादित केलेल्या जमिनीच्या संपादनाचा तपशील | एकरांत क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १. | कलम – ४, २१.४.१९८७ | ४६.४९ |
| २. | कलम ५ अन्वये वगळलेली जमीन | १०.८३ |
| ३. | कलम – ६, २०.०४.१९८८ | ३५.६६ |
| ४. | कलम ६ अन्वये मुक्त केलेली जमीन आणि निवाडा | १.०५ |
| ५. | निवाडा १२.०४.१९९० | ३४.६१ |
| ६. | निवाड्यानंतर मुक्त केलेली जमीन | २६.८३ |

| | | |
|---|---|---|
| ७. | शिल्लक जमीन क्षेत्रफळ [५-(६+७)] | ७.७८ |
| ८. | कलम २४ (२) अन्वये सीडब्ल्यूपी प्रलंबित | ४.०५६ |
| ९. | कलम २४ (२) अन्वये व्यतिरिक्त सीडब्ल्यूपी प्रलंबित | १.१२५ |
| १०. | फेटाळण्यात आलेले सीडब्ल्यूपी/ कायम झालेले संपादन | लागू नाही |
| ११. | मंजूर करण्यात आलेले सीडब्ल्यूपी/ जेथे वि. अ. या. दाखल झाली किंवा दाखल व्हायची आहे, तेथे मा. उच्च न्यायालयाने रद्दबातल केलेले संपादन | ०.५० |

२.२ असे की, त्यानंतर मूळ रिट याचिकाकर्त्यांनी सीडब्ल्यूपी क्र. ३७१/२००८ दाखल करून अधिग्रहणाला आव्हान देणारी रिट याचिका उच्च न्यायालयात दाखल केली, जी दिनांक ११.०१.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे, जमीन मालकांना त्यांच्या तक्रारीच्या निवारणासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांसमोर निवेदन दाखल करण्याचे स्वातंत्र्य देऊन, मागे घेण्यात आली. परिणामी, मूळ रिट याचिकाकर्त्यांनी दिनांक २२.०१.२००८ रोजी निवेदन दाखल करून त्यांची अधिग्रहित केलेली जमीन ही राज्याने मुक्त केलेल्या अशाच प्रकारे वस्तुस्थिती असलेल्या व्यक्तींच्या जमिनींच्या समप्रमाणात मुक्त करण्याची विनंती केली. असे की, त्यानंतर खटल्याच्या दुसऱ्या फेरीनंतर हे निवेदन फेटाळण्यात आले आणि मूळ जमीन मालकांची

त्यांची जमीन संपादनातून मुक्त करण्याची विनंती फेटाळण्यात आली. हाच विषय सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ मध्ये उच्च न्यायालयासमोर होता.

२.३ आता सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ वरून उद्भवलेल्या दिवाणी अपिलाचा विचार करता, मूळ जमीन मालकांनी त्यांची संपादित केलेली जमीन मुक्त करण्यासाठी दाखल केलेले निवेदन, जे सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ चा विषय होते, ते दिनांक १५.०६.२०१२ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आले.

२.४ त्याचप्रमाणे, मूळ रिट याचिकाकर्त्या - अनिता कुमारी शर्मा यांनी जमीन अधिग्रहणातून मुक्त करण्याची विनंती फेटाळून लावण्याविरुद्ध उच्च न्यायालयात सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ दाखल केले.

२.५ आक्षेपित सामायिक न्यायनिर्णय व आदेशाद्वारे, उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका मंजूर केल्या आहेत आणि शासनाने जारी केलेल्या आदेश/अधिसूचना आणि रिट याचिकाकर्ते - मूळ जमीन मालकांनी आपापल्या अधिग्रहित जमीन (जमिनी) मुक्त करण्याची केलेली विनंती फेटाळून लावण्याची राज्य शासनाची कृती ही, भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारी असल्याने, रद्दबातल ठरवली आहे आणि असे निरीक्षण नोंदवले आहे की, अशाच प्रकारे वस्तुस्थिती असलेल्या जमीन मालकांच्या जमिनीचा मोठा

भाग आधीच मुक्त झाला आहे. परिणामी, मूळ जमीन मालकांच्या मालकीची जमीन अधिग्रहणातून मुक्त करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

२.६ उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आक्षेपित सामाईक न्यायनिर्णय व आदेशामुळे व्यथित व असमाधानी होऊन, हरयाणा राज्य व इतर यांनी प्रस्तुत अपीले दाखल केली आहेत.

३. राज्याच्या वतीने उपस्थित विद्वान अति. महाधिवक्ता आलोक सांगवान, यांनी असा जोरदार युक्तीवाद केला की, अशा प्रकारे प्रश्नांकित जमिनीची राज्याला गरज आहे आणि त्यामुळे उच्च न्यायालयाने संबंधित जमीन अधिग्रहणातून मुक्त करण्याचे निर्देश देऊन चूक केली आहे.

३.१ राज्याच्या वतीने उपस्थित विद्वान अति. महाधिवक्ता श्री. सांगवान यांनी असे ठामपणे सादर केले आहे की, अधिनियमांतर्गत आवश्यक असलेल्या रीतसर प्रक्रियेचे पालन करून एकदा प्रश्नांकित जमिनी संपादित केल्या आणि त्यानंतर निवाडासुद्धा पारित झाला आणि नुकसान भरपाई देखील देण्यात आली आणि ताबा घेण्यात आला आणि जमिनी प्रत्यक्षात राज्य सरकार/ अधिग्रहण संस्थेच्या ताब्यात देण्यात आल्या. त्यामुळे संपादित जमिनी अधिग्रहणातून मुक्त करण्याचे निर्देश देऊन उच्च न्यायालयाने महत्वाची चूक केली आहे.

३.२ विद्वान अति. महाधिवक्ता यांनी पुढे असे सादर केले की, उच्च न्यायालयाने विविध रिट याचिकांमध्ये पारित केलेल्या आदेशा (शां) नुसार इतर जमिनी राज्याने मुक्त केल्या होत्या या बाबीचे उच्च न्यायालयाने योग्यरित्या आकलन केले नाही.

३.३ राज्याच्या वतीने उपस्थित विद्वान अति. महाधिवक्ता यांनी पुढे असे सादर केले की, जोवर सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ संदर्भात संपादित केलेल्या जमिनीचा संबंध आहे, तर प्रश्नांकित जमीन यापूर्वीच वापरण्यात आली आहे आणि जमिनीचा मलनिःस्सारण वाहिनीसाठी वापर केला जात असून सांडपाणी वाहिनी बांधण्यासाठी रु. १७ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे आणि म्हणून असे सादर करण्यात आले आहे की, जर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जमीन मुक्त करण्यात आली तर ते सार्वजनिक हिताच्या विरुद्ध असेल आणि रु. १७ कोटी इतकी रक्कम खर्च करून बांधण्यात आलेली संपूर्ण मलनिःस्सारण वाहिनी काढून टाकावी लागेल. परिसरातील रहिवाशांच्या वतीने उपस्थित विद्वान वकील श्री. गौरव अग्रवाल यांनीसुद्धा असा जोरदार युक्तिवाद केला आहे की, उच्च न्यायालयाने आदेश दिल्याप्रमाणे जर प्रश्नांकित जमीन अधिग्रहणातून मुक्त केली तर, आधीच बांधलेली मलनिःस्सारण वाहिनी काढून टाकावी लागेल, जे जनहिताच्या विरोधात आणि परिसरातील रहिवाशांच्या हिताच्याही विरोधात असेल.

३.४ पुढे असे सादर करण्यात आले आहे की, जेथे सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ संदर्भातील जमिनीचा प्रश्न आहे, तर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी राज्याला ती आवश्यक आहे आणि म्हणूनच राज्याने जमीन अधिग्रहणातून मुक्त करण्यास नकार देणे योग्य होते.

३.५ आता जेथे सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ संदर्भातील जमिनीचा प्रश्न आहे, तेथे असे सादर करण्यात आले आहे की, शॉपिंग मॉल आणि वाहनतळ बांधण्यासाठी सदर जमीन आवश्यक आहे आणि म्हणूनच आपली जमीन अधिग्रहणापासून मुक्त करण्याची मूळ जमीन मालकांची विनंती प्राधिकरणाने योग्यरीत्या फेटाळून लावली होती.

३.६ वरील निवेदने करून विद्वान अति. महाधिवक्ता यांनी असा जोरदार युक्तीवाद केला आहे की, आपली/ आपल्या जमीन/ जमिनी अधिग्रहणापासून मुक्त करण्याची रिट याचिकाकर्त्यांची - जमीन मालकांची विनंती फेटाळण्याची राज्य प्राधिकरणाने पारित केलेला आदेश फेटाळण्यात आणि रद्दबातल करण्यात उच्च न्यायालयाने महत्वाची चूक केली आहे आणि संपादित केलेली प्रश्नांकित जमीन (जमिनी) अधिग्रहणापासून मुक्त करण्याचे निर्देश देऊन उच्च न्यायालयाने महत्वाची चूक केली आहे.

४. सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/ २०१३ पासून उद्भवलेल्या दिवाणी अपिलाला विरोध करताना विद्वान ज्येष्ठ वकील श्री. नीरजकुमार जैन यांनी असा जोरदार युक्तीवाद केला आहे

की, प्रस्तुत प्रकरणात, राज्य सरकारने त्याच अधिसूचनेमुळे निर्माण झालेल्या जमिनीचा मोठा भाग मुक्त केला आहे आणि मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या मालकीच्या जमिनीचा केवळ लहान भाग मुक्त करण्यात आलेला नाही. मूळ रिट याचिकाकर्ते व इतर यांचा प्रश्नांकित भूखंड/जमीन वगळता, इतर सर्व जमिनींचा मोठा भाग अधिग्रहणातून मुक्त झाला आहे, हे दर्शविणारा नकाशा त्यांनी आम्हांला दाखविला आहे. त्यांनी असा जोरदार युक्तीवाद केला आहे की, कलम ४ अन्वये अधिसूचना काढण्यात आलेल्या एकूण अंदाजे ४६.४९ एकर जमिनीपैकी, १०.८३ एकर जमीन ही कलम ५क अन्वये चौकशीच्या टप्प्यात वगळण्यात आली आहे आणि त्यानंतर केवळ ३४.६१ एकर जमिनीच्या संदर्भात निवाडा घोषित करण्यात आला आणि त्यानंतर निवाडा पारित झाल्यानंतर पुढे २६.८३ एकर जमीन मुक्त करण्यात आली आणि ७.७८ एकर जमीन अधिग्रहणाखाली राहिली असून, त्यापैकी ४.०५६ एकर व १.१२५ एकर जमिनीच्या संदर्भात आणखी दोन रिट याचिका प्रलंबित आहेत आणि असे सादर करण्यात आले आहे की, मूळ रिट याचिकाकर्त्यांचे केवळ छोटे भूखंड मुक्त करण्यात आलेले नाहीत आणि या बाबीचे निरीक्षण उच्च न्यायालयाने यापूर्वीच नोंदविले आहे आणि असा निर्णय देण्यात आला आहे की, ते भेदभावपूर्ण आणि भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारे आहे.

४.१ मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित विद्वान ज्येष्ठ वकील श्री. नीरज कुमार जैन यांनी पुढे असे सादर केले आहे की, विपिन जिंदाल नावाच्या व्यक्तीने, ज्याची जमीन त्याच अधिसूचनेनुसार घोषित करण्यात आली होते, त्याने उच्च न्यायालयात रिट याचिका

(सीडब्ल्यूपी) क्र. ३७८०/२००८ दाखल करून अधिग्रहणाला आव्हान दिले आणि भूसंपादनातून जमीन (जमिनी) मुक्त करण्याची विनंती केली, जी उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे फेटाळून लावली. असे सादर करण्यात आले आहे की, सदर विपिन जिंदाल यांनी या न्यायालयात दिवाणी अपील (अपीले) दाखल केले (केली) आणि जमीन अधिग्रहणापासून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारच्या योग्य प्राधिकरणाकडे निवेदन दाखल करण्याची परवानगी जमीन मालकास (मालकांना) देऊन या न्यायालयाने वरील दिवाणी अपील निकाली काढले. असे सादर करण्यात आले आहे की, या न्यायालयाने विशिष्टरीत्या निरीक्षण नोंदविले आहे की, राज्य शासनाने काहीशी विसंगत भूमिका घेतली आहे आणि जर अशाच प्रकारे वस्तुस्थिती असलेल्या व्यक्तींना दिलासा देण्यात आला होता, तर त्यातील अपीलकर्त्याला तसाच दिलासा दयायला हवा होता. असे सादर करण्यात आले आहे की, त्यानंतर सदर विपिन जिंदाल यांनी त्यांना विभागाकडून प्राप्त झालेली नुकसान भरपाईची रक्कम व्याजासह परत करण्याच्या आणि हुडाच्या रस्ता अलाइनमेंटमध्ये येणारी जमीन सोडून देण्याच्या अटीवर त्यांच्या मालकीची जमीन दिनांक ०२.०८.२०१६ रोजीच्या आदेशाद्वारे मुक्त करण्यात आली आहे.

४.२ मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित विद्वान ज्येष्ठ वकील श्री. नीरजकुमार जैन यांनीही रिट याचिका क्र. ५७३२/१९८८ मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय व आदेश आमच्या निदर्शनास आणला आहे, ज्याद्वारे उच्च न्यायालयाने अधिग्रहण रद्द केले आहे. विद्वान ज्येष्ठ वकील श्री. नीरजकुमार जैन यांनी सीडब्ल्यूपी क्र. ११३७७/१९८८

मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय व आदेश सुद्धा आमच्या निदर्शनास आणला आहे, ज्याद्वारे राज्य शासनाने हरियाणा विधानसभेच्या तत्कालीन अध्यक्षांच्या मालकीचे काही क्षेत्र आणि राधा स्वामी सत्संग, कुरुक्षेत्र यांच्या मालकीचा अन्य एक भाग अधिग्रहित करण्यापासून माघार घेतली, असे निरीक्षण नोंदवून उच्च न्यायालयाने अधिग्रहण रद्द केले. असे सादर करण्यात आले आहे की, त्यामुळे अधिग्रहण सुरू ठेवण्याचा राज्य सरकारचा निर्णय मनमानी आणि भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारा आहे, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले. नीरजकुमार जैन, विद्वान ज्येष्ठ वकील यांनी पुढे असे सादर केले आहे की, लहान भाग / मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या मालकीच्या जमिनीचा काही भाग वगळता, इतर सर्व जमिनींचा / भूखंडाचा मोठा भाग मुक्त करण्यात आला आहे आणि प्रश्नांकित जमिनीची आता आवश्यकता नाही आणि म्हणूनच, मूळ जमीन मालकाची (मालकांच्या) जमीन (जमिनी) अधिग्रहणापासून मुक्त न करण्याचे कोणतेही वैध कारण नाही. असे सादर करण्यात आले आहे की, त्यामुळे रिट याचिका मंजूर करण्यात आणि त्याच नियमाने त्यांच्या जमिनी अधिग्रहणापासून मुक्त करण्याचे निर्देश राज्याला देण्यात उच्च न्यायालयाने कोणतीही चूक केलेली नाही.

४.३ सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ मधून उद्भवलेल्या वि. अ. या. (दि.) क्र. ११८४४/२०२२ मधील मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकील श्री. सचिन जैन यांनी, मूळ रिट याचिकाकर्त्याच्या मालकीच्या जमिनीचा वापर आधीच करण्यात आला आहे आणि ती सांडपाणी वाहिनीसाठी वापरण्यात आली आहे, यात काहीही वाद नसला

तरी, पाईप टाकण्यासाठी आधीच वापरलेली जमीन वजा करून उर्वरित जमीन मुक्त करण्यात यावी, अशी विनंती केली.

४.४ सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ मधून उद्भवलेल्या वि. अ. या. (दि.) क्र. ११८४२/२०२२ मधील मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी विद्वान ज्येष्ठ वकील श्री. नीरज कुमार जैन यांनी केलेले युक्तिवाद स्वीकारले आहेत.

५. उच्च न्यायालयातील सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ मधून उद्भवलेल्या दिवाणी अपीलात राज्याच्या वतीने उपस्थित विद्वान अति. महाधिवक्ता श्री. आलोक सांगवान आणि मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील नीरज कुमार जैन यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि अभिलेखावरील सामग्रीचे आणि राज्याने अधिग्रहणाची कार्यवाही कशा प्रकारे हाताळली आहे याचे अवलोकन केल्यानंतर, कार्यवाहीच्या सुरुवातीपासून ते अधिनियमाच्या कलम ५ क च्या टप्प्यावर आणि त्यानंतर वेळोवेळी संपादित केलेल्या जमिनी मुक्त केल्या आहेत ते अत्यंत निंदनीय आहे. यापूर्वी राज्य सरकारने प्रारंभी प्रभावशाली व्यक्तींसाठी जमिनी मुक्त केल्या आहेत आणि त्यानंतर उच्च न्यायालयाने पारित केलेल्या विविध आदेशांच्या अनुषंगाने, ज्यांना राज्याने कधीही आव्हान दिले नाही, त्यावरून सार्वजनिक कारणांसाठी आवश्यक असलेल्या अधिग्रहित जमिनी मुक्त करण्यामध्ये राज्याने अधिकारांचा मनमानी वापर केल्याचे दिसून येते. प्रारंभी, या बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे की, नवीन क्षेत्रे विकसित करण्यासाठी निवासी आणि व्यावसायिक क्षेत्र म्हणून

वापरासाठी आणि विकासासाठी जेव्हा जमीन संपादित केली जाते आणि तेही नगरविकास प्राधिकरणाद्वारे, तेव्हा भविष्यातील गरजेचा विचार करणे आवश्यक आहे आणि भविष्यातील विस्तार देखील विचारात घेणे आणि / किंवा लक्षात घेणे आवश्यक आहे. पुढील २०-२५ वर्षांतील भविष्यातील विस्तार विचारात घेणे आवश्यक आहे आणि/किंवा क्षेत्र/नवीन क्षेत्रांच्या विकासासाठी एवढ्या मोठ्या जमिनीचा वापर आवश्यक असताना, त्याचाही विचार करणे आवश्यक आहे.

५.१ प्रस्तुत प्रकरणात, फार पूर्वी म्हणजे, दिनांक २१.०४.१९८७ रोजी ४६.४९ एकर क्षेत्राचा मोठा भाग संपादित करण्यात आला होता, याबाबत वाद नाही. हरियाणा अर्बन डेव्हलपमेंट ऑथॉरिटीने (हुडा) ने सेक्टर ११, कुरुक्षेत्र मधील निवासी आणि व्यावसायिक क्षेत्र म्हणून जमिनीचा विकास आणि वापर करण्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात जमीन संपादित केली होती. कलम ४ अन्वये अधिसूचनेद्वारे संपादित केलेल्या ४६.४९ एकर जमिनीपैकी १०.८३ एकर जमीन ही कलम ५ अ अन्वये अधिसूचनेच्या टप्प्यावर संपादनातून वगळण्यात आली. उर्वरित ३५.६६ एकर जमिनीपैकी १.०५ एकर जमीन कलम ६ अन्वये काढलेली अधिसूचना आणि निवाडा या दरम्यान मुक्त करण्यात आली. त्यानंतर उर्वरित ३४.६१ एकर जमिनीपैकी, २६.८३ एकर जमीन ही दिनांक १२.०४.१९९० च्या निवाड्यानंतर मुक्त करण्यात आली. त्यामुळे शिल्लक जमीन केवळ ७.७८ एकर एवढ्यापुरतीच शिल्लक राहिली, त्यापैकी आता सुद्धा संपादित केलेली सुमारे ६ एकर जमीन खटल्याच्या भोवऱ्यात आहे. त्यामुळे सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ च्या मूळ रिट याचिकाकर्त्यांसंदर्भातील जमीन ही शिल्लक राहिलेल्या

जमिनीचे केवळ छोटे भूखंड आहेत. अभिलेखावर सादर करण्यात आलेल्या नकाशाचा विचार केल्यास, सध्याचा प्रश्नांकित छोटा भाग/भूखंड वगळता, जमिनीचा इतर सर्व मोठा भाग, ज्याचा तपशील वर नमूद करण्यात आला आहे, तो एकतर राज्याने स्वतःहून आणि / किंवा उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार मुक्त करण्यात आला आहे, ज्यांना राज्याने कधीही आव्हान दिले नव्हते आणि असे दिसून येते की, जमीन अधिग्रहणातून मुक्त करण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्देशांवर राज्य समाधानी होते. दिवाणी अपील क्रमांक ३२३५-३२३७/२०१५ मध्ये त्याच अधिसूचनेद्वारे संपादित केलेल्या जमिनींबाबत या न्यायालयाने यापूर्वी पारित केलेल्या आदेशावरून असे दिसून येते की, नुकसान भरपाई परत केल्यावर राज्य सरकारने जमीन मुक्त करण्याची या न्यायालयाने दखल घेतली. ज्या जमीन मालकांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या, अशा अनेक जमीन मालकांनी अधिसूचनेला आव्हान देणारी रिट याचिका दाखल केली होती, मात्र राज्य सरकारकडे निवेदन दाखल करण्याचे स्वातंत्र्य देऊन या रिट याचिका मागे घेण्यात आल्या, या बाबीचीसुद्धा या न्यायालयाने दखल घेतली आणि त्यानंतर नुकसान भरपाई परत करून जमीन मुक्त करण्याचे आदेश देऊन रिट याचिकाकर्त्यांच्या बाजूने निवेदनांना उत्तरे देण्यात आली. त्यामुळे या न्यायालयाने विपिन जिंदाल (उपरोल्लेखित) या प्रकरणातसुद्धा सरकारकडून काहीशी विसंगत भूमिका घेतली असल्याचे निरीक्षण नोंदवून संबंधित जमीन मालकाला निवेदन दाखल करण्यासाठी सोपविले/ परवानगी दिली. असे की, त्यानंतर विपिन जिंदाल यांच्या निवेदनाचा सकारात्मक विचार करून त्यांची जमीन अधिग्रहणातून मुक्त करण्यात आली आहे.

५.२ सीडब्ल्यूपी क्र. ११३७७/१९८८ या प्रकरणात उच्च न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय आणि आदेश, ज्याद्वारे उच्च न्यायालयाने ही रिट याचिका मंजूर केली आणि सदर अधिसूचनेद्वारे संपादित केलेल्या काही जमिनींसंदर्भातील अधिग्रहण रद्द केले, त्यावरून असे दिसून येते की, जी बाब उच्च न्यायालयाला महत्वाची वाटली ती म्हणजे, अधिनियमाच्या कलम ६ अंतर्गत अधिसूचनेनंतर, हरियाणा विधानसभेच्या तत्कालीन अध्यक्षांच्या मालकीचे काही क्षेत्र आणि राधा स्वामी सत्संग, कुरुक्षेत्र यांच्या मालकीचा अन्य एक भाग अधिग्रहित करण्यापासून सरकारने माघार घेतली.

५.३ अशा प्रकारे, वरील बाबींवरून हे स्पष्ट होते की, यापूर्वी सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ मधील रिट याचिकाकर्त्यांच्या मालकीची प्रश्नांकित जमीन वगळता, मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या मालकीचे जमिनींचे छोटे भाग / भूखंड वगळता, इतर सर्व जमीन मुक्त करण्यात आली आहे. आता ती जागा शॉपिंग मॉल आणि वाहनतळ म्हणून वापरण्याचा प्रस्ताव असल्याने, ती जमीन न सोडणे योग्य ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे की, प्रश्नांकित जमीन सन १९८७ मध्ये, एकूण ४६.४९ एकर जमिनीसह संपादित करण्यात आली आहे, त्यापैकी सध्याचा लहान भाग / जमिनीचा तुकडा वगळता, इतर सर्व जमीन मुक्त करण्यात आली आहे आणि / किंवा त्यासंदर्भातील अधिग्रहण रद्द करण्यात आले आहे. वरील तथ्ये व परिस्थिती लक्षात घेता, जेव्हा उच्च न्यायालयाने रिट याचिका - सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ मंजूर करून संपादनाची कार्यवाही रद्दबातल केली आणि प्रश्नांकित जमीन मुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत, तेव्हा उच्च न्यायालयाच्या विद्वान

एकल न्यायाधीश आणि/ किंवा खंडपीठाने कोणतीही चूक केली आहे, ज्यामुळे या न्यायालयास हस्तक्षेप करणे कारणीभूत ठरले, असे म्हणता येणार नाही. या न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाही. परंतु, पुनरावृत्तीचा धोका पत्करून, ज्या प्रकारे राज्याने अधिग्रहण प्रक्रिया हाताळली आहे आणि जमीन (जमिनी) मुक्त केली आहे/ केल्या आहेत आणि / किंवा अत्यंत मनमानी पद्धतीने अधिग्रहण रद्द करण्यास परवानगी दिली आहे, त्याबाबत आम्ही तीव्र नापसंती दर्शवितो. अशा प्रकारे निवासी आणि व्यावसायिक विकास हेतूंसाठी जमिनी संपादित केल्या होत्या, ज्याचा वापर सार्वजनिक कारणांसाठी आणि परिसर / क्षेत्राच्या विकासासाठी केला गेला नाही आणि ज्या जमिनी संपादित केल्या होत्या, त्या राज्य शासनाने मनमानीपणे आणि/ किंवा पक्षपातीपणे अधिकारांचा वापर केल्यामुळे, सार्वजनिक हेतूंसाठी वापरण्यात राज्य शासन अपयशी ठरले आहे. राज्य सरकार हे जनहिताचे आणि जनतेचे पालक असून सुरुवातीच्या टप्प्यात प्रभावी व्यक्तींच्या जमिनी मुक्त करण्यापेक्षा जनतेचे हित हे सर्वोच्च हित म्हणून विचारात घेणे आवश्यक होते. राज्य भविष्यात काळजी घेईल आणि संपादित केलेल्या जमिनी, ज्या हेतूने जमिनी संपादित केल्या आहेत, जमिनी त्याच उद्देशाने वापरल्या पाहिजेत, अन्यथा जमीन संपादित करण्याचा उद्देश आणि हेतू निष्फळ ठरेल.

५.४ आता, जेथे सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/ २०१४ वरून उद्भवलेल्या दिवाणी अपिलाचा संबंध आहे, तेथे सर्वप्रथम या बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे की, प्रश्नांकित जमिनीचा वापर आधीच सांडपाणी वाहिन्यांसाठी केला गेला आहे आणि सांडपाणी वाहिन्या

बांधण्यासाठी अंदाजे १७ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामुळे सार्वजनिक कारणासाठी आणि परिसरातील रहिवाशांसाठी वापरण्यात येणाऱ्या मलनिःस्सारण वाहिन्यांसाठी आधीच वापरण्यात आलेल्या सदर जमिनीसंदर्भातील भूसंपादन फेटाळण्यात आणि रद्द करण्यात उच्च न्यायालयाने अत्यंत गंभीर चूक केली आहे. त्या प्रकरणात उच्च न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय आणि आदेश कायम राहिल्यास, १७ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या आणि सार्वजनिक कामासाठी वापरात असलेल्या संपूर्ण सांडपाणी वाहिन्या काढून टाकाव्या लागतील. मलनिःस्सारण वाहिन्यांसाठी आधीच वापरलेली जमीन वगळता, उर्वरित जमीन मुक्त करण्यात यावी हा मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद स्वीकारता येणार नाही. जमिनीचा काही भाग मुक्त करता येऊ शकत नाही आणि/किंवा जमिनीच्या काही भागापुरते अधिग्रहण रद्द करता येऊ शकत नाही. या बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे की, प्रस्तुत प्रकरणात भूसंपादन करणे, निवाडा पारित करणे आणि नुकसानभरपाई देणे यांसह अधिग्रहण पूर्ण झाले आहे आणि प्रश्नांकित जमीन सर्व भारापासून मुक्त करून राज्य सरकारकडे आहे. अशा परिस्थितीत, सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेला आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश टिकू शकत नाही आणि तो फेटाळण्यास आणि रद्दबातल करण्यास पात्र आहे.

५.५ त्याचप्रमाणे, जेथे सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/ २०१३ मधून उद्भवणाऱ्या दिवाणी अपीलाचा संबंध आहे, तेथे मूळ रिट याचिकाकर्त्यांनी जमीन भूसंपादनातून मुक्त करण्याचे केलेले निवेदन हे, सदर जमीन रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक असल्याच्या कारणास्तव

फेटाळण्यात येत आहे. नकाशाचे अवलोकन केल्यानंतर, आमचे मत असे आहे की, जेव्हा प्रश्नांकित जमीन रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी राज्याला आवश्यक आहे आणि निवाडा घोषित करणे, निवाडा पारित करणे आणि नुकसान भरपाई देणे यांसह संपूर्ण अधिग्रहण प्रक्रिया जेव्हा पूर्ण झाली आहे, तेव्हा रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या सदर जमिनीसंदर्भातील अधिग्रहण रद्द केले जाऊ नये आणि / किंवा ती जमीन मुक्त करणे आवश्यक नव्हते. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी अशा प्रकारे आवश्यक असलेली सदर जमीन मुक्त न करण्यात राज्य सरकारने पूर्णपणे समर्थनीय होते. अशा परिस्थितीत, सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेला आक्षेपित न्यायनिर्णय व आदेश फेटाळण्यास आणि रद्दबातल करण्यास पात्र आहे.

६. वरील बाबी लक्षात घेता आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, सीडब्ल्यूपी क्र. १६३४६/२०१३ मध्ये पारित केलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशामुळे उद्भवलेले वि. अ. या. (दि.) क्र. ११८४३/२०२२ पासून उद्भवलेले दिवाणी अपील वरील निरीक्षणांसह फेटाळण्यात येत आहे.

७. वर नमूद केलेल्या कारणांसाठी, वि. अ. या. (दि.) क्र. ११८४४/२०२२ (सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ पासून उद्भवलेले) पासून उद्भवलेली दिवाणी अपीले आणि वि. अ. या. (दि.) ११८४२/२०२२ (सीडब्ल्यूपी क्र. ६७२९/२०१३ पासून उद्भवलेले) आणि वि. अ. या.

(दि.) क्र. ३९८०/२०२३ पासून उद्भवलेले मंजूर करण्यात येत आहेत. सीडब्ल्यूपी क्र. १०४५२/२०१४ व ६७२९/२०१३ मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेले आक्षेपित न्यायनिर्णय व आदेश फेटाळण्यात आणि रद्दबातल ठरवण्यात येत आहेत. प्रकरणाची खटल्याची तथ्ये आणि परिस्थिती पाहता, खर्चाबाबत कोणतेही आदेश दिले जाणार नाहीत.

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x